परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाकडून स्वच्छतेसाठी विशेष मोहीम 6 च्या पूर्वतयारीचा टप्पा सुरू

भारत सरकारच्या "स्वच्छतेसाठी विशेष मोहीम 6" घोषणेच्या अनुषंगाने, परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने विदेशातील भारतीय मिशन्स/पोस्ट तसेच प्रादेशिक पासपोर्ट कार्यालयांसह आपल्या सर्व कार्यालयांमध्ये ही मोहीम सुरू केली आहे. ही मोहीम दोन टप्प्यांमध्ये आयोजित करण्यात आली आहे. 15 सप्टेंबर 2026 ते 30 सप्टेंबर 2026 या कालावधीत पूर्वतयारीचा टप्पा राबविण्यात येत असून, त्यानंतर 02 ऑक्टोबर 2026 ते 31 ऑक्टोबर 2026 या कालावधीत अंमलबजावणीचा टप्पा राबविण्यात येईल.

2. पूर्वतयारीच्या टप्प्यादरम्यान, मंत्रालयाकडून विदेशातील मिशन्स/पोस्ट आणि प्रादेशिक पासपोर्ट कार्यालयांसह आपल्या सर्व कार्यालयांसाठी विविध बाबींशी संबंधित उद्दिष्टे निश्चित करण्याची व्यापक कार्यवाही करण्यात येत आहे. यामध्ये नोंदींचा आढावा, प्रलंबित तक्रारी, MPs/राज्य सरकारांकडून प्राप्त संदर्भ, संसदीय आश्वासने, स्वच्छता, कार्यालयीन व्यवस्थापन आणि कार्यालयीन जागेचे सुशोभीकरण यांचा समावेश आहे.

3. या उपक्रमांव्यतिरिक्त, मंत्रालयाकडून सर्व कार्यालयांमध्ये ई-कचरा ओळखणे आणि त्याची विल्हेवाट लावणे यावर तसेच स्वच्छतेबाबत जनजागृतीपर उपक्रम राबविण्यावर लक्ष केंद्रित केले जाईल.

4. त्यानंतर 02 ऑक्टोबर 2026 ते 31 ऑक्टोबर 2026 या कालावधीत अंमलबजावणीचा टप्पा सुरू होईल. या कालावधीत पूर्वतयारीच्या कार्यवाहीदरम्यान निश्चित करण्यात आलेले उपक्रम निर्धारित कालमर्यादेत राबविण्यात येतील. यामध्ये निश्चित केलेल्या ठिकाणी स्वच्छता अभियान राबविणे, कालबाह्य रेकॉर्ड आणि भंगाराची विल्हेवाट लावणे, जागा मोकळी करणे, ओळख पटवण्यात आलेल्या प्रलंबित बाबींचे निराकरण करणे तसेच कार्यालयीन परिसर आणि सामायिक क्षेत्रांमध्ये सुधारणा करणे यांचा समावेश असेल. योग्य यंत्रणांच्या माध्यमातून या मोहिमेच्या प्रगतीवर देखरेख ठेवण्यात येईल.

5. स्वच्छतेसाठी विशेष मोहीम 6 च्या माध्यमातून, परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे सर्व अधिकारी स्वच्छ आणि कार्यक्षम कार्यस्थळे कायम राखणे, प्रलंबित बाबी कमी करणे तसेच सरकारी संसाधनांचा सर्वोत्तम वापर सुनिश्चित करणे याबाबतची आपली वचनबद्धता व्यावहारिक आणि परिणामकारक पद्धतीने पुढे नेत आहेत.

नवी दिल्ली

23 सप्टेंबर 2026